# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### तहसिल कार्यालय चिखली जि.बुलडाणा तलाठी संवर्गातील पदे रिक्त असल्याबाबत

**(१) १०४०१ (०४-०४-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तहसिल कार्यालय चिखली जि.बुलडाणा अंतर्गत तलाठी संवर्गातील ७ पदे ब-याच दिवसापासून रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी अथवा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून तलाठी पदे भरण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, रिक्त पदे भरण्यासंदर्भात काय कार्यवाही करण्यात येणार आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०७-२०१५) :** (१), (२) व (३) तहसिल कार्यालय, चिखली, जिल्हा बुलढाणा अंतर्गत तलाठी संवर्गातील ७ पदे रिक्त नसून ५ पदे रिक्त होती. सदर रिक्त पदे जिल्हा अंतर्गत बदल्याने दिनांक १६.०५.२०१५ च्या आदेशान्वये भरण्यात आलेली आहेत.

---

### बुलढाणा जिल्हयामध्ये क तिर्थक्षेत्राचे प्रस्ताव अनुदानासाठी प्रलंबित असल्याबाबत

**(२) १०४०२ (०७-०४-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयामध्ये क तिर्थक्षेत्राचे प्रस्ताव अनुदानासाठी संबंधित विभागाकडे ब-याच वर्षापासून शासनाच्या निधी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील क वर्ग तिथक्षेत्राच्या विकासाकरिता वाढीव निधीची तरतुद करुन देण्यात येणार आहे काय,

(३) क वर्ग तिर्थक्षेत्रासाठी वाढीव निधीची तरतुद करुन देणार असल्यात किती दिवसात वा केव्हा देणार ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

बुलढाणा जिल्ह्याकरिता ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्र विकास योजनेकरीता मंजूर असलेल्या निधीपेक्षा जास्त मागणीचे प्रस्ताव प्राप्त झाल्याने सन २०१३-१४ पासून काही प्रस्ताव मंजुरीकरीता प्रलंबित आहेत.

(२) व (३) बुलढाणा जिल्ह्याकरीता सन २०१४-१५ मध्ये ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्र विकास योजनेकरीता रु.२०० लक्ष इतका निधी मंजूर होता. सदर निधीव्यतिरिक्त जिल्हा नियोजन समिती, बुलढाणा यांनी रु. १६८.३० लक्ष एवढा निधी पुनर्विनियोजनाने उपलब्ध करुन दिलेला आहे. तसेच सन २०१५-१६ मध्ये सदर योजनेकरीता रु. २५० लक्ष इतक्या निधीची तरतूद केली असून, वाढीव निधी उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे मागणी करण्यात येत आहे.

---

**पानमळ्याचा समावेश पीक वर्गात न केल्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील पानमळयांची संख्या कमी झाल्याबाबत**

**(३) १०४११ (०८-०३-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पानमळ्याचा समावेश पिक वर्गात न केल्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील पानमळयांची संख्या ५ ते ६ हजारावरुन केवळ ५० ते ६० पानमळ्यापर्यंत झाल्याची माहे जानेवारी, २०१५ रोजी अथवा त्या सुमारास उघडकीस आले अहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्ह्याच्या पानमळ्याच्या संख्येमध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने तसेच पानमळ्याचा समावेश पिक वर्गात करण्याच्या अनुषंगाने शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०६-२०१५) :** (१) नाही. जिल्हास्तरावर या संबंधी कोणत्याही तक्रारी अथवा निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील कृषी विभागाअंतर्गत शेतक-यांसाठी सन २०१२-१३ पासून अद्यापपर्यंत अनुदान न मिळाल्याबाबत**

**(४) १०४१९ (०८-०३-५०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील कृषी विभागाअंतर्गत शेतक-यांसाठी ४५ एच.पी.टॅक्टर खरेदीवर शासनाकडून अनुदान देण्याचे जाहीर केले असून अनेक लाभार्थी शेतकऱ्यांना सन २०१२-१३ पासून अद्यापपर्यंत अनुदान न मिळाल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी अथवा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थी शेतक-यांना अनुदान देण्यासंदर्भात शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०६-२०१५) :** (१)व (२) हे खरे नाही.

सन २०१२-१३ मध्ये कृषी यांत्रिकीकरण योजने अंतर्गत बुलढाणा जिल्हयासाठी रु.४३.६३ लाख आर्थिक तरतूदीच्या मर्यादेत प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वानुसार ९२ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

सन २०१३-१४ मध्ये सदर कार्यक्रम राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या निधीतून राबविण्यात आल्यामुळे, व सदर निधीतून ट्रॅक्टरसाठी अनुदान अनुज्ञेय नसल्याने, त्या वर्षात ट्रॅक्टर हा घटक वगळण्यात आला होता.

सन २०१४-१५ पासून सदर योजना कृषी यांत्रिकीकरण उपअभियंता म्हणून राबविण्यात येत असून, जानेवारी, २०१५ अथवा त्यासुमारास अनुदान न मिळाल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजीव गांधी जिवनदायी आरोग्य योजनेतंर्गत संपुर्ण राज्यात स्वतंत्र डाटा ऑपरेटर पदाची कमतरता असल्याबाबत**

**(५) १०४२० (०८-०४-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतंर्गत संपुर्ण राज्यात स्वतंत्र डाटा ऑपरेटर पदाची कमतरता असल्यामुळे योजनेचा लाभ घेण्यासाठी रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांची हेळसांड थांबविण्यासाठी राज्यात प्रत्येक राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतंर्गत सुरु असलेल्या हॉस्पिटलला कायमस्वरुपी डाटा ऑपरेटरची पदे भरती

करण्यासंदर्भात शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) अद्यापपर्यंत पदे भरतीची कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबनाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०७-२०१५) :** (१) नाही.
(२) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालये, टीपीए व विमा कंपनी यांच्यात झालेल्या करारानुसार डाटा एंट्री ऑपरेटरची नियुक्ती करणे संबंधित रुग्णालयाची जबाबदारी आहे. तथापि योजनेमध्ये समाविष्ट शासकीय रुग्णालयामध्ये योजनेच्या कामकाजासाठी डाटा एंट्री ऑपरेटरची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करुन त्यांच्या वेतनावरील खर्च रुग्णालयास विमा कंपनीकडून प्राप्त होणाऱ्या दाव्यांच्या रक्कमेतुन भागविण्यास तात्पुरत्या स्वरुपात मंजुरी देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील लेंडी आंतरराज्य प्रकल्पांतर्गत बाधीत कुटूंबांच्या पूनर्वसनाबाबत**

**(६) १०४३५ (०८-०४-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील लेंडी आंतरराज्य प्रकल्पांतर्गत बाधीत कुटुंबांना पूनर्वसनासाठी भूखंड वाटप करण्यासंबधी निर्माण होत असलेल्या असंख्य अडचणी लक्षात घेवून प्रकल्प बाधीतांना भुखंड वाटप करण्यासाठी जिल्हाधिका-यांना खाजगी वाटा घाटीने भूसंपादन करण्याचे अधिकार देण्याची मागणी प्रकल्प बाधीत व लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०१५ वा त्या सुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने तशा प्रकारे जिल्हाधिका-यांना खाजगी वाटा घाटीने भूसंपादन करण्याचा अधिकार दिले आहेत काय,
(३) उक्त प्रकरणी निर्णय न घेतल्यास पूनर्वसना संबंधी शासनाची उपाययोजना काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे नाही.
(२) होय खाजगी क्षेत्रातील जमिन सिंचन व इतर प्रकल्पासाठी खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने घेणे बाबत शासन निर्णय क्र.संकीर्ण ०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे, २०१५ अन्वये गठीत केलेल्या जिल्हाधिकारी असलेल्या समितीस अधिकार दिलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील रस्त्याची कामे प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत प्रलंबित ठेवल्या प्रकरणी इम्डोटेक इन्फ्रास्टक्चर, जि.जि. कंन्ट्रक्शन व शंकर कन्ट्रक्शन यांच्यावर कारवाई करण्याबाबत**

**(७) १०४३९ (०९-०४-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील (१) कावळगाव-बळेगाव (२) लोणी-अंबूलगा (३) मरखेल-लोणी ता.देगलूर या रस्त्याची कामे प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवल्या प्रकरणी इम्डोटेक इन्फ्रास्टक्चर, जि.जि. कंन्ट्रक्शन व शंकर कन्ट्रक्शन यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कारवाईचे स्वरुप काय आहे,
(३) उक्त कंपनी व कंन्ट्रक्शनवर कारवाई केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(४) उक्त कामे प्रलंबित ठेवल्या प्रकरणी शासनाची भुमिका काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे. प्रश्नांकीत कावळगांव-बळेगांव या रस्त्यांच्या कंत्राटदारास नुकसान भरपाई (Liquidity Damages) ची वसुलीची कार्यवाही करण्यात येत असल्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. लोणी-अंबुलगा व मरखेल-लोणी या रस्त्यांची कामे विहित मुदतीत पुर्ण न केल्यास गोपनीय अहवालामध्ये नोंद घेण्यात येईल याबाबत कंत्राटदारास सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आमदार निधीतील खर्चाच्या मर्यादेत वाढ करण्याबाबत**

**(८) १०४५८ (०७-०४-२०१५). श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विधानसभा व विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरीत करण्यात येणा-या निधीच्या खर्चाच्या मर्यादेत वाढ करण्याबाबत नियोजन विभागाकडून प्रस्ताव करण्यात आला आहे, हे खरे आहे का,
(२) असल्यास त्याचे स्वरुप काय व तो कधी पर्यंत अमंलात आणण्यात येणार आहे,
(३) नसल्यास अशा स्वरुपाच्या प्रस्तावाबाबत शासन विचार करणार आहे का व कधी पर्यंत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०७-२०१५) :** (१) होय,
(२) व (३) आमदार स्थनिक विकास कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय निधीमध्ये वाढ करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. याबाबत शासनाने निर्णय घेतल्यानंतर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

---

**कर्करोगाचे निदान जिल्हा पातळीवर करणेबाबत**

**(९) १०४७२ (०७-०४-२०१५). श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कर्करुग्णाचे मोठ्या प्रमाणातील वाढते स्वरुप पाहाता जिल्हा पातळीवरील रुग्णालयात कर्क रोगाचे निदान करण्याकरीता तज्ञ व सुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, सदर निर्णयाची अंमलबजावणी शासन कधीपर्यंत करणार आहे,
(३) नसल्यास, उक्त प्रश्नी शासन अशा स्वरुपाचा निर्णय घेणार आहे काय असल्यास कधी पर्यंत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०७-२०१५) :** (१), (२) व (३) जिल्हा रुग्णालयात कर्करोग तज्ञ डॉक्टरांची कमतरता लक्षात घेता टाटा रुग्णालयाच्या मदतीने तज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न टाटा मेमोरीयल रुग्णालयाबरोबर सुरु आहे.

---

**मुंबई-लांजा-भांबेड व्हाया देवरुख साखरपा मार्गे जाणारी कायम स्वरुपी एस.टी सेवा नियमितपणे आणि कायमस्वरुपी देण्याबाबत**

**(१०) १०४९३ (०८-०४-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-लांजा-भांबेड व्हाया देवरुख साखरपा मार्गे मुंबईहून सकाळी ८ वाजता सुटणारी गाडी ठराविक हंगामानंतर बंद केली जाते, हे खरे आहे काय,
(२) तसेच गोवा महामार्गाने जाणा-या दोन कायमस्वरुपी गाडया आहेत मात्र मुंबई-लांजा-भांबेड व्हाया देवरुख साखरपा मार्गे जाणारी कायम स्वरुपी कोणतीही एस.टी.नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आतिल मार्गावर राहात असलेल्या २५ ते ३० गावात ग्रामीण नागरीकांना प्रवासाच्या दृष्टीने त्रासाला सामोरे जावे लागते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, एस.टी.महामंडळाने या मार्गावर गरजु प्रवासी नागरीकांना आपली सेवा नियमितपणे आणि कायमस्वरुपी न देण्याची कारणे काय आहेत,
(५) याबाबत एस.टी.महामंडळाने प्रवासींना तसेच नागरीकांना आपली सेवा नियमितपणे आणि कायमस्वरुपी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०७-२०१५) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.

होळी, गणपती व उन्हाळी गर्दीचा हंगाम या कालावधीत कोकणात मोठ्या प्रमाणावर प्रवासी येत असतात, त्याच्या सोयीसाठी सदरची फेरी ठरावित कालावधीत सुरु करुन त्यानंतर

भारमान कमी झाल्यावर ती स्थगित करण्यात येते. लांजा आगारातून येळवण-बोरीवली ही गाडी गोवा महामार्गाने जाते. आतील मार्गावर रहात असलेल्या २५ ते ३० गावातील नागरिकांना साखरपा बसस्थानक हे नजिक असून साखरपा बसस्थानकावरुन एकूण ६ फे-या मुंबई, परळ, ठाणे, बोरीवली या मार्गावर चालनात आहेत.
(४) सदर मार्गावर लांजा-भांबेड-मुंबई या मार्गावर पुरेसे भारमान मिळत नसल्याने नियमीत व कायमस्वरुपी बससेवा देण्यात आलेली नाही.
(५) प्रवासी गर्दीच्या हंगामात प्रवाशांची सोय होण्यासाठी या मार्गावर लांजा आगारामार्फत लांजा-भांबेड-मुंबई अशी फेरी चालविण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अपंगाच्या अनुदानित शाळांमधील निदेशक व कर्मचा-यांना निवृत्ती वेतन व उपदान योजना लागु नसल्याबाबत

**(११) १०४९८ (२३-०२-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अपंगाच्या अनुदानित शाळांमधील ४०० निदेशक व कर्मचा-यांना निवृत्ती वेतन व उपदान योजना लागु नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेष शाळांमधील शिक्षक व कर्मचा-यांना सन १९८१ पासून सदर योजना लागु आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०९-०७-२०१५) :** (१) अपंगाच्या ८६ कर्मशाळेमधील ७६६ निदेशक व शिक्षकेतर कर्मचारी यांना निवृत्ती वेतन योजना लागू नाही, हे खरे आहे.
(२) होय.
(३), (४) व (५) राज्यातील अपंगाच्या कर्मशाळेमधील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती योजना लागू करण्याबाबतच्या प्रस्तावावर आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचेकडून अधिकची माहिती मागविण्यात आलेली आहे. सदर माहिती प्राप्त होताच त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही शक्य आहे.

---

## अहमदनगर जिल्ह्यात स्वातंत्र्य सैनिकांचे बनावट प्रमाणपत्र तथा नामनिर्देशनाच्या आधारे नोकरी मिळविल्याबाबत

**(१२) १०५४३ (०६-०४-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वातंत्र्य सैनिकांचे बनावट प्रमाणपत्र तथा नामनिर्देशन घेवून अहमदनगर जिल्ह्यात (तालुका निहाय) किती उमेदवारांनी बनावट नोकऱ्या मिळविल्या आहेत,

(२) असल्यास, शासन सेवेत स्वातंत्र्य सैनिकांच्या बनावट प्रमाणपत्राद्वारे किती नोकऱ्या देण्यात आल्या व स्विकारणाऱ्यांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, येथून पुढे असे प्रकार होवू नयेत यासाठी कोणती उपाययोजना केली आहे अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१५) :** (१) व (२) अहमदनगर जिल्ह्यात श्री.संजय कृष्णराव झावरे, यांनी सहायक निबंधक सहकारी संस्थेमध्ये बनावट नामनिर्देशनाच्या आधारे नोकरी मिळविल्याबाबत दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ अन्वये तक्रार प्राप्त झाली असून सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २४ जून, १९९७ मध्ये दिलेल्या अनुदेशानुसार जिल्हाधिकारी यांच्या अधिपत्याखाली चौकशी कक्ष नेमून सदर कक्षामार्फत चौकशी करण्याचे निदेश शासन स्तरावरुन देण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त बोगस प्रमाणपत्र तथा नामनिर्देशन घेऊन कोणत्याही उमेदवाराने नोकरी मिळविल्याचे आढळून आलेले नाही.

(३) व (४) बनावट नामनिर्देशनासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास त्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अधिपत्याखाली चौकशी कक्ष नेमण्याच्या सूचना व त्यासंदर्भातील कार्यपध्दती शासन निर्णय दिनांक २४.६.१९९७ अन्वये अगोदरच विहित करण्यात आली आहे.

---

## शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होणेबाबत

**(१३) १०५४६ (०७-०४-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केवळ ७० टक्के क्षेत्र कोरडवाहू आहे व केवळ तेथेच चांगल्या उत्पादनासाठी तुषार व ठिबक सिंचन पध्दत स्किारण्यासाठी शेतक-यांना प्रवृत्त करण्यासाठी कोणते नवे प्रयोग सुरु केले आहेत,

(२) असल्यास, प्रयोगाअंती शेतकऱ्यांपर्यंत योजना पोहचविण्यासाठी कोणती प्रभावी अंमलबजावणी शासनाने केली आहे,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०६-२०१५) :**(१) राज्यात शेतकऱ्यांनी तुषार व ठिबक सिंचन पध्दत स्विकारण्यासाठी १९८६-८७ पासून राज्य पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना सुरु केली.

सन २०१०-११ पासून केंद्र शासनाने राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियान सुरु केले. सदर अभियान सन २०१४-१५ साठी राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत शेतावरील पाणी व्यवस्थापन उपअभियान म्हणून राबविण्यात आले. त्याअंतर्गत अवर्षण प्रवण क्षेत्रातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ६०% व बहुभूधारक शेतकऱ्यांना ४५% अनुदान दिले जाते. तसेच अवर्षण प्रवण क्षेत्राबाहेरील अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांना ४५% व बहुभूधारक शेतकऱ्यांना ३५% अनुदान दिले जाते. सन २०१५-१६ पासून सदर उपअभियान प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत "प्रति थेंब अधिक पिक" म्हणून राबविण्यात येणार आहे.
(२) व (३) सुक्ष्म सिंचन योजनेची जाहिरात वृत्त पत्रातून लेख, जाहिरात देवून, दुरध्वनी आकाशवाणीवर तज्ञांच्या मुलाखतीद्वारे, कृषि प्रदर्शनामध्ये, शेतकरी मासिकातून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविली जाते. तसेच किसान कॉल सेंटरच्या माध्यमातून देखील माहिती दिली जाते.

---

**मौजे सुस्ते-तारापूर (ता.पंढरपूर,जि.सोलापूर) येथील भिमा नदीच्या पात्रात बंधारा बांधण्याबाबत**

**(१४) १०५६७ (०७-०४-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सुस्ते-तारापूर (ता.पंढरपूर,जि.सोलापूर) येथील भिमा नदीच्या पात्रात बंधारा बांधण्यास सन २००९ मध्ये मंजूरी मिळूनही सदर प्रस्तावास अद्याप मान्यता देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास याची कारणे काय आहेत,
(३) तसेच सदर बंधाऱ्याचे काम तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०७-२०१५) :** (१) सदर प्रकल्पास मंजूरी सन २००९ मध्ये मिळालेली नसून शासन निर्णय क्र. कोपबं/४८७/१२८६/२१८/८७/लपा.१ दि.१४.०२.१९८९, अन्वये रु. ८७.२४ लक्ष इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता मिळाली होती. तथापी सदर प्रशासकीय मान्यता व्यपगत झाली आहे.
(२) भिमा नदीवर को.प.बंधारा सुस्ते तारापूर या बंधाऱ्याच्या खालील बाजूस ९ कि.मी. अंतरावर को.बं.पूळूज, ता.पंढरपूर, हा प्रकल्प सन १९८८ मध्ये पूर्ण करण्यात आलेला आहे. सदर पूळूज बंधाऱ्यांच्या पाण्याचा फुगवटा मागील बाजूस १७ कि.मी. पर्यंत होत असून, मंजूर सुस्ते तारापूर बंधारा स्थळी ३.७९ मी. इतक्या उंचीचे पूळूज बंधाऱ्याचे पाणी साठून राहते. त्यामुळे प्रस्तावित सुस्ते तारापूर बंधारा प्रकल्पाचे संकल्पित लाभक्षेत्र २८०४ हे ऐवजी ४५८ हे इतके होते. त्यामुळे प्रकल्प हा आर्थिक मापदंडात बसत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील शासकीय /निमशासकीय कार्यालयातील अपंग कर्मचा-यांवर होणारे अत्याचार व अन्याय थांबविण्याबाबत

**(१५) १०५७३ (०६-०४-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील शासकीय/निमशासकीय कार्यालयातील अपंग कर्मचा-यांवर होणारे अत्याचार व अन्याय याबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांना महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी (अ ते ड) संघटना सोलापूर शाखा यांनी दिनांक ११ नोव्हेंबर, २०१४ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०७-२०१५) :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदर निवेदनात नमूद केलेल्या मागण्या ज्या कार्यालयांशी संबंधित आहेत ती कार्यालये ज्या प्रशासकीय विभागांच्या अखत्यारित येतात त्या प्रशासकीय विभागांना प्रस्तुत प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याबाबत या विभागाच्या दि. १८ डिसेंबर, २०१४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माढा तालुक्यात (जि.सोलापूर) शेततळयाचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(१६) १०५८४ (०७-०४-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा तालुक्यात (जि.सोलापूर) शेततळयाचे प्रस्ताव मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच ज्या शेतक-यांची शेततळी मंजूर आहेत, त्यांना निधी देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०७-२०१५) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रुबी मिलच्या कामगारांवर उपासमारीची वेळ आल्याबाबत**

**(१७) १०५८८ (०७-०४-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१ नियम ५८ (७) (ड) ची अंमलबजावणी न केल्यामुळे रुबी मिलच्या कामगारांना उपासमारीची वेळ आल्याबाबतचे निवेदन मा.कामगार मंत्री यांना गिरणी कामगार कर्मचारी निवारा आणि कल्याणकारी संघ यांनी दिनांक ३ नोव्हेंबर, २०११ रोजी वा त्यानंतर अनेक वेळा दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिल मालक कामगारांच्याबाबत सामज्यंस करार करुन कामगारांना कामावर घेत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर मिलमध्ये काम करणारे तथापि मिल व्यवस्थापनाने सेवेतून कमी केलेल्या कामगारांची उपासमार होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१५-०६-२०१५) :** (१) गिरणी कामगार कर्मचारी निवारा आणि कल्याणकारी संघ यांनी दिनांक ३ नोव्हेंबर, २०११ रोजीचे निवेदन तत्कालीन मा.मंत्री (कामगार) यांना सादर केले होते. सदर निवेदनावर तत्कालीन मा.मंत्री (कामगार) यांची अभिटिप्पणी घेवून सदर निवेदन तत्कालीन मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांना परस्पर सादर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) रुबी मिल व्यवस्थापनाने अद्यापपर्यंत सन २००२-२००३ व २०११ मध्ये मान्यताप्राप्त कामगार संघटनेबरोबर करार करुन सुमारे ५०० कामगारांनी स्वेच्छा निवृत्ती स्वीकारली आहे. त्यामुळे कामगारांना कामावर घेत नाही असे म्हणणे योग्य होणार नाही.

(३), (४) व (५) कामगारांनी स्वेच्छानिवृत्ती स्विकारुन सदर स्वेच्छानिवृत्ती योजनेनुसार मिळालेले सर्व फायदे स्विकारलेले आहेत.

दिनांक १५/११/२०११ रोजी तत्कालीन मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत गिरणी मालक व कामगार यांनी आपआपसात सामंजस्यांने निर्णय घेण्याच्या सूचना तत्कालीन मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांनी दिल्या होत्या.

रुबी मिलचे कामकाज खोपोली येथे स्थलांतरीत केले असून तेथे ५५ कामगारांना नव्याने काम मिळाले आहे. सद्यस्थितीत (स्वेच्छा निवृत्ती घेतलेले परंतु रोजगार मिळण्याकरीता अर्ज केलेले) १० कामगारांना रुबी मिलच्या जागे वरती सुरु असलेल्या नवीन व्यवसायात काम देण्यात आलेले आहे.

---

**सेनगांव (ता.जि.हिंगोली) येथील तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयास प्राप्त झालेल्या अनुदानाच्या वापरासंबंधी नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालाबाबत**

**(१८) १०६०९ (०८-०४-२०१५). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगांव (ता.जि.हिंगोली) येथील अकराव्या व बाराव्या योजनेमध्ये युजीसीकडून तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयास प्राप्त झालेल्या अनुदानाच्या वापरासंबंधी चौकशी समिती नेमण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशी समितीच्या अहवालात काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित महाविद्यालय व संस्थाचालकाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१५) :** (१) होय.

(२) चौकशी समितीने त्यांचा अहवाल विद्यापीठ अनुदान आयोग, पश्चिम विभागीय कार्यालय, पुणे यांना सादर केला आहे, या प्रकरणी विदयापीठ अनुदान आयोगाकडून पुढील कार्यवाही बाबतचे आदेश प्राप्त झालेले नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड (जि.रायगड) तालुक्यातील बिरवाडी शहर पंचायतींच्या अकार्यक्षम पध्दतीने व वाढलेल्या बेकायदेशीर बांधकामाबाबत**

**(१९) १०६२२ (०८-०४-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रांतीसिंह नानासाहेब पुरोहित महामोहोपाध्याय द.वा.पोतदार व कामगार नेते गं.द.आंबेकर यांच्या पुनित वास्तव्याने संपुर्ण देशात परिचित असलेले महाड (जि.रायगड) तालुक्यातील बिरवाडी शहर पंचायतींच्या अकार्यक्षम पध्दतीने व वाढलेल्या बेकायदेशीर बांधकामाने समस्यांच्या विळख्यात सापडल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने पाहणी/ चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार उक्त बेकायदेशीर बांधकाम तात्काळ हटविण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१५) :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय याबाबत गट विकास अधिकारी यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून काही बांधकामे बेकायदेशीर असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) सदर बेकायदेशीर बांधकामामधील एक अनधिकृत टपरी बांधकाम हटविण्यात आले असून इतर बेकायदेशीर बांधकाम हटविण्याबाबत ग्रामपंचायत बिरवाडीने नोटीसा बजावलेल्या असून पुढील कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाड औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कंपनीतून सोडण्यात येणा-या घातक सांडपाण्यामुळे होणारे प्रदुषण

**(२०) १०६२३ (०६-०४-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील औद्योगिक क्षेत्रातील घातक अशा रासायनिक कंपनीच्या सांडपाणी नदी पात्रात सोडण्याचे प्रकार राजरोसपणे सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक क्षेत्रातील सीईटीपी केंद्रातून सोडण्यात येणा-या घातक सांडपाण्यामुळे व रासायनिक प्रदुषणाने आजुबाजुच्या नागरिकांच्या आरोग्यावर तसेच नदीतील मासे व मगरीनाही मोठया प्रमाणात याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार नदी पात्रात सांडपाणी सोडणाऱ्या दोषी कंपन्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (३०-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, महाड यांचे अहवालानुसार औद्योगिक क्षेत्रातील सीईटीपी केंद्रातून नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या घातक सांडपाण्यामुळे व रासायनिक प्रदुषणामुळे आजुबाजुच्या लोकांच्या आरोग्यावर दुष्पपरिणाम झाल्याचे रुग्ण प्राथमिक आरोग्य केंद्र, चिंभावे येथील बाहयरुग्ण तथा आंतररुग्ण विभागात आढळून आले नाहीत.

सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, अलिबाग यांचे अहवालानुसार सदर प्रकरणी मासे तसेच मगरी मेल्याचे निदर्शनास आले नाही अथवा त्यासंदर्भात तक्रारी त्यांचे कार्यालयास प्राप्त झालेल्या नाहीत

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील (ईबीसी) विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम अद्याप देण्यात आली नसल्याबाबत**

**(२१) १०६२८ (०९-०४-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील (ईबीसी) विद्यार्थ्यांची सन २०१३ -१४ या शैक्षणिक वर्षाची शिष्यवृत्तीची रक्कम अद्याप देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शिष्यवृत्तीची रक्कम उपरोक्त विद्यार्थ्यांना न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर रक्कम किती कालावधीत देण्यात येण्याचे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०१-०७-२०१५) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) या विभागाच्या शासन निर्णय दि.२४ मार्च, २०१५ नुसार "सन २०१३-१४ या वर्षाचे प्रलंबित ई.बी.सी.चे शुल्क अदा करणेसाठी" आदेश निर्गमीत करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत बंदिस्त निवारा प्रणालीचा वापर करुन पुणे सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हयातील क्षारपड जमिन विकास करण्याबाबत**

**(२२) १०६३६ (०४-०४-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत बंदिस्त निवारा प्रणालीचा वापर करुन पुणे सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हयातील क्षारपड जमिन विकास करण्यासाठी माहे सप्टेंबर, २०११ पासून ही योजना सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील शिरोळ तालुक्यातील शेडशाळ, कुरुंदवाड व उदगांव या गांवांचा सदर योजनेत समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेत किती क्षेत्राचा समावेश आहेत व किती लाभार्थ्यांना त्यांचा लाभ आतापर्यंत मिळाला आहे,

(४) असल्यास, सदर योजनेसाठी सन २०११-१२ या वित्तीय वर्षामध्ये पुणे विभागांतर्गत कोल्हापूर जिल्हयातील किती निधी मंजूर करण्यात आला व अद्याप किती निधीची आवश्यकता आहे.

(५) असल्यास, सदरचा आवश्यक तो निधी तातडीने मंजूर करण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०६-२०१५) :** (१) व (२) होय.

(३) शिरोळ तालुक्यातील एकुण क्षारपड क्षेत्र १२१५ हे. असुन लाभार्थी संख्या ७०० आहे. आत्तापर्यंत लाभार्थ्यांना लाभ मिळालेला नसून सदर योजना प्रगतीपथावर असल्याने योजना पूर्ण झाल्यावरच लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळणार आहे.

(४) सन २०११-१२ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील कामांना एकुण रु.१०४८.०५ लक्ष प्रशासकीय मान्यता प्राप्त असुन, पुणे विभागांतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील कामांना निधी मंजूर करण्यात आलेला नाही.

सद्य:स्थितीत एकुण रु.१४०.०० लक्ष प्रलंबित देयके अदा करणेसाठी निधीची आवश्यकता आहे.

(५) केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध करुन देणेबाबत कृषि विभागास रु.४१५.०० लक्ष निधी मागणी करण्यात आली असून सदर मागणीमध्ये रु.१४०.०० लक्ष कोल्हापूर विभागाकरीता अंतर्भूत आहे.

---

## मौजे कुरण (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील चार सिंमेटचे बंधाऱ्यांच्या कामाचे प्रस्तावाबाबत

**(२३) १०६६२ (०८-०४-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुरण (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील चार सिंमेटचे बंधाऱ्यांच्या कामाचे प्रस्ताव ग्रामपंचायत कुरण यांनी ठराव करून पंचायत समिती जुन्नर (जि.पुणे) यांच्याकडे माहे जून, २०१४ मध्ये वा त्यासुमारास मंजुरीसाठी पाठविले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रस्तावास अद्यापही मंजूरी देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) उपरोक्त ठिकाणी चार सिमेंट बंधारे बांधण्यासाठी कोणती तातडीने कार्यवाही केली आहे व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

मौजे कुरण (ता.जुन्नर, जि.पुणे) येथे सिमेंट बंधारे बांधणे कामाबाबतचा प्रस्ताव पंचायत समिती जुन्नरकडे आढळून येत नाही. तथापि, मा.खासदार शिरुर लोकसभा मतदारसंघ यांचे या कामाचे सर्वेक्षण करणेबाबतचे दिनांक ३ मार्च, २०१५ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.

(३) मा.खासदार यांचे पत्राचे अनुषंगाने सर्वेक्षण करणेबाबत उप अभियंता, छोटे पाटबंधारे विभाग आंबेगाव (जुन्नर) यांना जिल्हा परिषद, पुणे यांनी कळविले आहे.

---

## रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर तालुक्यात धरणांवर कोट्यवधी रूपयांचा खर्च करून्ही कालव्याचे व धरणांची काम अद्यापही अपूर्ण असल्याबाबत

**(२४) १०६७२ (०७-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर तालुक्यात धरणांवर कोट्यवधी रूपयांचा खर्च करूनही कालव्याचे व धरणांची कामे अद्यापही अपूर्णच असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणांची कामे अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे तसेच धरणांमध्ये पाणी असूनही तालुका तहानलेला असल्याची स्थिती निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार उक्त धरण व कालव्यांची कामे तात्काळ पूर्ण करण्यासाठी शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०७-२०१५) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

संगमेश्वर तालुक्यात रांगव व साखरपा लपा योजनांमध्ये अनुक्रमे ५.५२४ द.ल.घ.मी. व ३.६९२ द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला असून कालवा कामे प्रगती पथावर आहेत.

गडगडी लपा प्रकल्पाचा संकल्पीत पाणीसाठा १३.५२६ दलघमी असून निर्मिती पाणीसाठा ७.४४४ द.ल.घ.मी. आहे.

गडनदी मध्यम प्रकल्पाचा संकल्पीत पाणीसाठी ८३.२१२ दलघमी असून आजमितीस ७५.६२ दलघमी पाणीसाठा निर्मिती झालेली आहे.

(४) गडनदी मध्यम प्रकल्पाचा समावेश वेगवेर्धीत सिंचन लाभा योजनेमध्ये करण्यात आलेला आहे. प्रकल्पास आवश्यक जमिनीचे भू-संपादन करुन निधीचे उपलब्धतेनुसार कालव्याची कामे पूर्ण करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर तालुका पंचायत समिती कार्यालयात रिक्त पदे असल्याबाबत

**(२५) १०६७४ (०७-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर तालुका पंचायत समिती कार्यालयात गेल्या कांही वर्षापासून रिक्त पदे असल्यामुळे अतिरिक्त कामांचा भार वरिष्ठ प्रशासकिय यंत्रणेवर पडत असल्याने नुकतेच माहे जाने, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रिक्त पदांमुळे नागरिकांच्या कामांवर देखील परिणाम होत आहे, हे ही खरे आह काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तदनुसार उक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०६-२०१५) :** (१), (२), (३), (४) व (५) रत्नागिरी जिल्ह्यातील पंचायत समिती संगमेश्वर येथील गट विकास अधिकारी गट-अ चे पद भरले असून सहा, गटविकास अधिकारी गट-ब हे पद रिक्त आहे. सदर रिक्त पद बदलीने/पदोन्नतीने भरण्यात येत आहे. महाराष्ट्र विकास सेवा संवर्गा व्यतिरिक्त अन्य वर्ग १ व वर्ग-२ संवर्गापैकी शिक्षणाधिकारी गट-ब चे पद रिक्त असुन सदर रिक्त पद भरण्याबाबत संबंधित प्रशासकीय विभागात कळविण्यात आले आहे. उपरोक्त रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य कर्मचाऱ्याकडे देण्यात आला आहे.

पंचायत समिती संगमेश्वर येथे वर्ग ३ व ४ ची सर्व संवर्गातील ११५ पदे मंजूर असून ९९ पदे भरलेली आहेत व १६ पदे रिक्त आहेत. सदरची रिक्त पदे सरळसेवेने व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) लोकवस्तीसह हमरस्त्यावरील बागायतीलमधील आंबा, काजू कलमांचा मोहोर टिकावा, त्यावरील तुडतुडेसारख्या किटकांचा प्रादुर्भाव कमी होणेबाबत**

**(२६) १०६७५ (०८-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) लोकवस्तीसह हमररस्त्यावरील बागायतीलमधील आंबा, काजू कलमांचा मोहोर टिकावा, त्यावरील तुडतुडेसारख्या किटकांचा प्रादुर्भाव कमी व्हावा व चांगली फळधारणा व्हावी यासाठी केल्या जाणाऱ्या विषारी औषधांच्या फवारणींमुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यांचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत संबंधितानी वेळीच लक्ष घालावे व फवारणीमुळे होणारे प्रदुषण रोखावे अशी मागणी स्थानिक जनतेकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०६-२०१५) :** (१) अशी तक्रार कृषी विभागाकडे प्राप्त झालेली नाही.
(२) अशी मागणी स्थानिक जनतेकडून प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयामध्ये अनेक नविन वस्त्या उभ्या राहत असून त्याचा परिणाम मध्य व पश्चिम रेल्वेवर होत असल्याबाबत**

**(२७) १०६८३ (०६-०४-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयामध्ये अनेक नविन वस्त्या उभ्या राहत असून त्याचा परिणाम मध्य व पश्चिम रेल्वेवर व ठाणे शहरातील परिवहन सेवेवर होत असल्याने ठाणे शहराला प्रस्तावित मेट्रो रेल्वे विस्तार मिरा-भाईंदर ते दहिसर पर्यंत करण्यात यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री यांचेकडे एका पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) होय. ठाणे शहराकरीता राबविण्यात येणा-या पायाभूत सुविधांतर्गत ठाण्याची वाहतूक कोंडी कमी करण्याचा हेतू साध्य करण्यासाठी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मेट्रो व मोनो रेलसारखे प्रकल्प हाती घेतले आहेत. मुंबई उपनगरांमध्ये तसेच ठाणे शहर (विशेषतः घोडबंदर रोडवरील) व जिल्ह्यांमध्ये येत्या २ ते ३ दशकात होणारी लोकसंख्या वाढ, विकास आणि रोजगार वाढ तसेच मुंबईशी ठाणे शहर जोडण्याची निकड लक्षात घेता प्राधिकरणाने वडाळा-घाटकोपर-ठाणे (तीन हात नाका) कासारवडवली मेट्रो प्रकल्पाला सविस्तर प्रकल्प अहवाल सल्लागारामार्फत तयार केला आहे. सदर मेट्रो मार्ग ३२ कि.मी. असून या मार्गावर ३० स्थानके प्रस्तावित आहेत. सदर प्रकल्प अंमलबजावणीकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मान्यता दिली असून सदर अहवालावर शासनस्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच सर्वकष परिवहन अभ्यासातील (CTS) शिफारशीनुसार पुढील टप्प्यात प्राधान्यक्रमानुसार सदर मार्ग कासारवडवली ते दहिसर पर्यंत जोडण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित आहे.

---

**ठाणे शहरातील वाढत्या प्रदूषणाला प्रतिबंध घालण्याबाबत करावयाच्या उपाययोजना**

**(२८) १०६८४ (६-४-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरातील प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाने काही मापदंड घालुन दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे शहरात विविध विकास कामे करणारे कंत्राटदार आणि बांधकाम व्यावसायिक साहित्याची ने-आण करतांना त्यातील धुलिकणांची मात्रा दिलेल्या मानांका पेक्षा

कितीतरी पट जास्त असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास केलेल्या एका पाहणीत आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रदुषणास कारणीभूत ठरणारे बांधकाम व्यावसायिक आणि रस्ते व अन्य स्थापत्यकामे करणाऱ्या व विविध विकास कामे करणारे ठेकेदारांवर दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय महापालिकेने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (३) वरील निर्णयानुसार अद्यापपर्यंत किती बांधकाम व्यावसायिक आणि रस्ते व अन्य स्थापत्यकामे करणाऱ्या व विविध विकास कामे करणारे ठेकेदारांवर कारवाई केली आहे, असल्यास, त्यांच्याकडून किती दंडात्मक वसूली करण्यात आली व अद्याप ज्यांनी दंडात्मक रक्कम भरली नाही त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, ठाणे शहरातील या वाढत्या प्रदूषणाला प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१४-७-२०१५) :** (१) होय.

(२), (३) व (४)

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार सल्फर व नायट्रोजन यांचे प्रमाण मानांकापेक्षा कमी असल्याचे आढळून आले आहे. तथापि, श्वसनक्षम धुलिकणांचे प्रमाण सरासरीपेक्षा किंचित अधिक आढळून आले आहे.

यासंदर्भात ठाणे महानगरपालिकेने बांधकाम साहित्याची ने आण करते वेळी होणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण करण्याबाबत विकासक, कंत्राटदार व ठेकेदार यांचेवर रु.५०००/- ते रु.२५०००/- या प्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे असे २७.३.२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

त्यानुसार आर्थिक वर्ष २०११-१२ ते २०१४-१५ या कालावधीत एकूण १२६५ व्यावसायिकांकडून रु.३० लक्ष दंडाची वसुली केल्याचे ठाणे महानगरपालिकेने दिनांक २७.३.२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे शहरातील येऊर (जि.ठाणे) येथील राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या जागेत जागतिक दर्जाचे "थीम पार्क" विकसित करण्याबाबत

**(२९) १०६८९ (०७-०४-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील येऊर (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या जागेत जागतिक दर्जाचे "थीम पार्क" विकसित करण्यात यावे अशी मागणी स्थानिक

लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) अद्यापही यासंदर्भात निर्णय घेतला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१५) :** (१) सदर निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरा भाईंदर (जि. ठाणे) शहरातील शिवाजी महाराज पुतळयावर फन गोल्डन नेस्ट ते भाईंदर पश्चिम पर्यंतचा रस्ता एलिव्हेटेड करण्याबाबत**

**(३०) १०६९३ (०७-०४-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा भाईंदर (जि. ठाणे) शहरातील शिवाजी महाराज पुतळयावर फन गोल्डन नेस्ट ते भाईंदर पश्चिम पर्यंतचा रस्ता एलिव्हेटेड करण्यात यावा, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ८ डिसेंबर, २०१४ राजी एका पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०७-२०१५) :** (१) होय.
(२) मिरा-भाईंदर शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्र.८ ते गोल्डन नेस्ट पर्यंतचा छत्रपत शिवाजी महाराज मार्गावर वाहतूकीची कोंडी होत असल्याने उड्डाणपूल बांधण्यासाठी रु.२५६ कोटी रकमेच्या अंदाजपत्रकास व त्याकिरता कर्ज उभारण्यास मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभेने मान्यता दिली आहे. त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील मुळा डावा कालव्यावरील भागडा चारी पाणी योजना दुरूस्ती व थकीत वीजबीला अभावी बंद असल्याबाबत**

**(३१) १०७०८ (०७-०४-२०१५). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयातील मुळा डावा कालव्यावरील भागडा चारी पाणी योजना देखभाल दुरूस्ती व थकीत वीजबीला अभावी बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डाव्या कालव्याचे पाणी टेलपर्यंत गेल्याशिवाय भागडा चारी योजना सुरू करण्यास पाटबंधारे विभाग परवानगी देत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भागडा चारीच्या विद्युत भोयरी नादुरूस्त असून निधी अभावी केवळ १ मीटर वापरली जात आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, भागडा चारी योजनेला मदत करण्यास शासन टाळाटाळ करत आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, भागडा चारीवर १०० कोटी रूपये खर्च करून ६३ साठवण तलावांपैकी बहुतांशी साठवण तलांवामध्ये पाणी जात नाही हे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, वरील प्रस्तावाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(७) असल्यास, चौकशीनुसार शासन कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे?

**श्री. गिरीष महाजन (०१-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.

कारण पुच्छ भागातील सिंचनास पुरेसा विसर्ग मिळाल्याशिवाय शिर्ष भागातील विमोचक उघडले जात नाहीत. भागडा चारी आधी सुरु केल्यास पुच्छ भागातील सिंचन विस्कळीत होते.
(३) हे खरे नाही.
(४) सदर योजना सिंचन व्यवस्थापन विभागाकडे नव्याने हस्तांतरीत झाली आहे. त्यानुसार विज बीलासाठी तसेच स्थापत्य कामासाठी व योजना चालु ठेवणेसाठी २७०१ देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षांतर्गत अंदाजे रु. ५५ लक्ष निधीची तरतुद होणेसाठी चा प्रस्ताव क्षेत्रीय स्तरावर तयार करण्याची कार्यवाही चालु आहे.
(५) हे खरे नाही.

भागडा पाईपचारी वर रु. १०० कोटी खर्च झाला नाही. भागडा पाईपचारी योजनेवर लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर अंतर्गत अहमदनगर मध्यम प्रकल्प विभाग अहमदनगर मार्फत माहे ०३/२०१५ अखेर प्रस्तावित २८.२४ कोटी रक्कमेपैकी २५.१५ कोटी खर्च झालेला आहे. या योजनेअंतर्गत भरुन देण्यात येणाऱ्या तलावाची संख्या ६३ नसुन ५९ आहे. पाईपलाईनमध्ये असलेल्या तुट फुटीमुळे, व्हॉल्व दुरुस्ती, खंडीत विद्युत पुरवठा व गळतीमुळे सन २०१३-१४ मध्ये ५९ पैकी २८ तलावामध्ये पाणी देण्यात आले. सर्व तलावामध्ये पाणी जात नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील झोपडपट्टीवाशीयांकरीता खार जमिनीवर मोफत घरे बांधून देण्याबाबत**

**(३२) १०७१६ (०८-०४-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील झोपडपट्टीवासीयांकरीता खार जमिनीवर मोफत घरे बांधून देण्याची मा.मुख्यमंत्र्यांकडून केंद्र शासनाकडे मागणी माहे सप्टेंबर, २०११ मध्ये करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत केंद्र शासनाकडून कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०२-०७-२०१५) :** (१) बृहन्मुंबईतील केंद्र शासनाच्या मालकीच्या मिठागराच्या जमिनी झोपडपट्टी पुनर्वसनासाठी व परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीसाठी उपयोगात आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे प्राधान्याने वर्ग करण्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांकडून दि.१३ नोव्हेंबर, २०१३ व दि. ३० डिसेंबर, २०१४ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.
(२) खार जमिनीसंदर्भातील विषय तात्काळ निकाली काढण्यासाठी महसूल व वन विभागामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे :-

१) महसूल व वन विभागाच्या दि.५.५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना प्रलंबित अपिलासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेण्याबाबत कळविण्यात आले आहे.

याव्यतिरिक्त खालील नमूद केलेल्या बाबी शासनच्या विचारार्थ आहेत.

१) खार जमिनीचा विषय हाताळण्यासाठी प्रधान सचिव (महसूल) यांची समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करणे.

२) खार जमिनीच्या वापराबाबत एक बृहत आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेवर संनियंत्रण ठेवण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती नेमणे.

३) खार जमिनीचा विषय हाताळण्यासाठी एक स्वतंत्र विभाग स्थापन करण्याऐवजी महसूल व वन विभागांतर्गत प्रधान सचिव (महसूल) यांच्या नियंत्रणाखाली एक स्वतंत्र कक्ष स्थापन करणे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नांदुरा तालुक्यातील मौजे धाडी पोच रस्ता अत्यंत नादुरुस्त असल्याबाबत

**(३३) १०७३५ (०७-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदारसंघातील नांदुरा तालुक्यातील मौजे धाडी पोच रस्ता अत्यंत नादुरुस्त असून या रस्त्यावरुन सर्व सामान्य नागरिक दुचाकी व चारचाकी वाहन धारकांना अवागमन करणे त्रासाचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु.४० लक्ष निधीची आवश्यकता आहे, ही बाब खरी आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) उपरोक्त रस्त्याची मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग खामगांव यांना वेळोवेळी सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन दिले आहे. जिल्हा परिषद बुलढाणाकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त नाही.

(४) नांदुरा तालुक्यातील धाडी पोच रस्ता हा ग्रामीण मार्ग क्र.८ असून या रस्त्याची एकूण लांबी १.१० कि.मी. आहे. सदर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याचे काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी व निकषास अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदुरा तालुक्यातील मौजे नायगांव ते तिकोडी पर्यतचा रस्ता अत्यंत नादुरुस्त असल्याबाबत**

**(३४) १०७३६ (०७-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदारसंघातील नांदुरा तालुक्यातील मौजे नायगांव ते तिकोडी पर्यतचा रस्ता अत्यंत नादुरुस्त असून या रस्त्यावरुन सर्व सामान्य नागरिक दुचाकी व चारचाकी वाहनधाकांना अवागमन करणे त्रासाचे झाले असल्याची बाब माहे २०१५ मध्ये निदर्शनास आली असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु.३० लक्ष निधीची आवश्यकता आहे, ही बाब खरी आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) उपरोक्त रस्त्याची मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग खामगांव यांना वेळोवेळी सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१) होय अंशत: खरे आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन दिले आहे. जिल्हा परिषद बुलढाणाकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त नाही.

(४) नांदुरा तालुक्यातील रामा ६ ते नायगांव तिकोडी हा इ.जि.मा. ४४ दर्जाचा रस्ता असून सदर रस्त्याची लांबी २.८० कि.मी. असून पृष्ठभाग खडीचा आहे. सदर रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त होणाऱ्या निधी व निकषाच्या अधिन राहून करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदुरा तालुक्यातील मौजे खुमगांव ते भिलवडी पर्यंचा रस्ता अत्यंत नादुरस्त असल्याबाबत

**(३५) १०७३७ (०७-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातल मलकापूर विधानसभा मतदार संघातील नांदुरा तालुक्यातील मौजे खुमगांव ते भिलवडी पर्यंचा रस्ता अत्यंत नादुरस्त असून या रस्त्यावरुन सर्व सामान्य नागरिक, दुचाकी व चारचाकी वाहन धारकांना अवागमन करणे त्रासाचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु.५० लक्ष निधीची आवश्यकता आहे, ही बाब खरी आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) उपरेक्त रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, खामगांव यांना वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-०७-२०१५) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन दिले आहे. जिल्हा परिषद बुलढाणाकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त नाही.

(४) नांदुरा तालुक्यातील मौजे खुमगांव ते भिलवडी हा रस्ता इ.जि.मा. ४० दर्जाचा असून या रस्त्याची लांबी १.४०० कि.मी. असून पृष्ठभाग खडीचा आहे. सदर रस्त्याच्या मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त होणाऱ्या निधी व निकषाच्या अधिन राहून करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे खातखेड ते वडगांव ते धानोरा रस्ता (ता.नांदुरा, जि.बुलडाणा) अत्यंत नादुरुस्त असल्याबाबत

**(३६) १०७४० (०७-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधासभा मतदार संघातील नांदुरा तालुक्यातील मौजे खातखेड ते वडगांव ते धानोरा रस्ता अत्यंत नादुरुस्त असुन या रस्त्यावरून सर्व सामान्य नागरीक, दुचाकी व चारचाकी वाहन धारकांना अवागमन करणे त्रासाचे झाले असल्याची बाब फेब्रु. २०१५ मध्ये निदर्शनास आली असुन या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी रु.५० लक्ष निधीची आवश्यकता आहे ही बाब खरी आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता दुरूस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) उपरोक्त रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकांनी वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन दिले आहे. जिल्हा परिषद बुलढाणाकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त नाही.
(४) नांदुरा तालुक्यातील मौजे खातखेड ते वडगांव हा रस्ता सन २००१-२०२१ विकास योजनेनुसार ग्रामीण मार्ग क्र. २६ दर्जाच्या असून या रस्त्याची लांबी २.०० कि.मी. असून पृष्ठभाग खडीचा आहे.

वडगाव ते धानोरा हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. २७ दर्जाचा असून या रस्त्यांची लांबी १.०० कि.मी. असून पृष्ठभाग खडीचा आहे. सदर रस्त्यांचे मजबूतीकरण व डांबरीकरण करण्याचे काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी व निकषास अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मौजे रा.म.क्र.६ ते कोलासर ते शेलगांव मुकुंद रस्त्यामधील ( ता.नांदुरा जि.बुलढाणा) ३ किमी लांबी रस्ता अत्यंत नादुरूस्त असल्याबबत

**(३७) १०७४१ (०७-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील नांदुरा तालुक्यातील मौजे रा.म.क्र.६ ते कोलासर ते शेलगांव मुकुंद रस्त्यामधील ३ किमी लांबी रस्ता अत्यंत नादुरूस्त असून या रस्त्यावरुन सर्व सामान्य नागरीक, दुचाकी व चारचाकी वाहन धारकांना अवागमन करणे त्रासाचे झाले असल्याची बाब फेब्रु. २०१५ मध्ये निदर्शनास आली असुन या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी रु.५० लक्ष निधीची आवश्यकता आहे, ही बाब खरी आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता दुरूस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) उपरोक्त रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोक प्रतिनीधी यांनी कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, खामगांव यांना वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन दिले आहे. जिल्हा परिषद बुलढाणाकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त नाही.

(४) नांदुरा तालुक्यातील मौजे कोलासर ते शेलगांव मुकुंद हा रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार इतर जिल्हा मार्ग क्र.४२ चा भाग रस्ता आहे. या भाग रस्त्याची लांबी ३.६०० कि.मी.असून पृष्ठभाग डांबरी आहे. सदर लांबीपैकी १.६०० कि.मी. लांबीतील डांबरी नुतनीकरणाचे काम सन २०१४-१५ मध्ये पूर्ण करण्यात आले असून उर्वरीत २.०० कि.मी. लांबीतील डांबरी नुतनीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त होणा-या निधी न निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मौजे फुली ते कंडारी (ता. नांदुरा जि.बुलडाणा) रस्ता अत्यंत नादुरूस्त असल्याबाबत

**(३८) १०७४२ (०७-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील नांदुरा तालुक्यातील मौजे फुली ते कंडारी रस्त्यामधील १/२०० ते २/२०० किमी लांबी रस्ता अत्यंत नादुरूस्त असुन या रस्त्यावरून सर्व सामान्य नागरीक, दुचाकी व चारचाकी वाहन धारकांना अवागमन करणे त्रासाचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवार, २०१५ मध्ये निदर्शनास आली असुन या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी रु. १५ लक्ष निधीची आवश्यकता आहे, ही बाब खरी आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता दुरूस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) उपरोक्त रस्त्याची मजबुतीकरणे व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोक प्रतिनीधी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांना वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन दिले आहे. जिल्हा परिषद बुलढाणाकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त नाही.
(४) नांदुरा तालुक्यातील मौजे फुली ते कंडारी हा रस्त सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार ग्रामीण मार्ग क्र.३८ दर्जाचा असून या रस्त्याची एकूण लांबी ३.६० कि.मी आहे. त्यापैकी १.०० कि.मी. लांबीचे डांबरीकरणाचे काम झालेले असून उर्वरीत २.०० कि.मी. लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी व निकषाच्या अधिन राहुन प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील नांदुरा तालुक्यातील मौजे पिंप्री अढाव ते पोटळी रस्ता अत्यंत नादुरुस्त असल्याबाबत

**(३९) १०७४३ (०७-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील नांदुरा तालुक्यातील मौजे पिंप्री अढाव ते पोटळी रस्त्यामधील २.५ किमी लांबी रस्ता अत्यंत नादुरुस्त असुन या रस्त्यावरुन सर्व सामान्य नागरीक, दुचाकी व चारचाकी वाहन धारकांना अवागमन करणे त्रासाचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली असुन या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी रु. ४० लक्ष निधीची आवश्यकता आहे, ही बाब खारी आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता दुरूस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, उपरोक्त रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोक प्रतिनीधी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांना वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन दिले आहे. जिल्हा परिषद बुलढाणाकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त नाही.

(४) नांदुरा तालुक्यातील पिंप्री अढाव ते पोटळी हा रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार इतर जिल्हा मार्ग क्र. ४५ चा भाग रस्ता असून या भाग रस्त्याची लांबी 4.00 कि.मी. आहे. सदर लांबीपैकी १.०० कि.मी. लांबीतील रस्त्याचे डांबरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून झालेले आहे. उर्वरित ३.०० कि.मी. लांबीतील रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनापासून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील नांदुरा तालुक्यातील मौजे रामपुर पोच रस्ता अत्यंत नादुरूस्त असल्याबाबत

**(४०) १०७४४ (०७-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील नांदुरा तालुक्यातील मौजे रामपुर पोच रस्त्यामधील १ कि.मी. लांबी रस्ता अत्यंत नादुरूस्त असुन या रस्त्यावरुन सर्व सामान्य नागरीक, दुचाकी व चारचाकी वाहन धारकांना अवागमन करणे त्रासाचे झाले

असल्याची बाब फेब्रु. २०१५ मध्ये निदर्शनास आली असुन या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी रु. २० लक्ष निधीची आवश्यकता आहे ही बाब खरी आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याने दुरूस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, उपरोक्त रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांना वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) जिल्हा परिषदेकडे निवेदन प्राप्त नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन दिले आहे.

(४) नांदुरा तालुक्यातील मौजे रामपुर पोच रस्ता हा सन २००१-२०२१ च्या रस्ते विकास योजनेनुसार ग्रामीण मार्ग क्र.१२ दर्जाचा असून सदर रस्त्याची लांबी ०.५० कि.मी. आहे. सदर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याचे काम निधी व निकषाच्या अधिन राहून जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील नांदुरा तालुक्यातील मौजे खुमगांव ते मामुलवाडी रस्त्याबाबत

**(४१) १०७४५ (०७-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील नांदुरा तालुक्यातील मौजे खुमगांव ते मामुलवाडी रस्त्यामधील १ किमी लांबी रस्ता अत्यंत नादुरुस्त असून या रस्त्यावरुन सर्व सामान्य नागरीक, दुचाकी व चारचाकी वाहन धारकांना अवागमन करणे त्रासाचे झाले असल्याची बाब फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु. २० लक्ष निधीची आवश्यकता आहे ही बाब खरी आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) उपरोक्त रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांना वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन दिले आहे. जिल्हा परिषद बुलढाणाकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त नाही.
(४) नांदुरा तालुक्यातील मौजे खुमगांव ते मामुलवाडी हा रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार इतर जिल्हा मार्ग क्र. ३९ चा भाग रस्ता असुन या भाग रस्त्याची लांबी ३.२० कि.मी. आहे. सदर रस्त्याची दुरुस्ती जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील नांदुरा तालुक्यातील मौजे रा.म.६ ते सोनज रस्त्याबाबत**

**(४२) १०७४७ (०८-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील नांदुरा तालुकयातील मौजे रा.म.६ ते सोनज रस्त्यामधील २ किमी लांबी रस्ता अत्यंत नादुरुस्त असून या रस्त्यावरुन सर्व सामान्य नागरीक, दुचाकी व चारचाकी वाहन धारकांना अवागमन करणे त्रासाचे झाले असल्याची बाब फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु. ४० लक्ष निधीची आवश्यकता आहे ही बाब खरी आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) उपरोक्त रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांना वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन दिले आहे. जिल्हा परिषद बुलढाणाकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त नाही.
(४) नांदुरा तालुकयातील नांदुरा दीगाव इतर जिल्हा मार्ग क्र.३९ या रस्त्याचा नांदुरा सोनज हा भाग रस्ता आहे. नांदुरा ते सोनज या भाग रस्त्याची लांबी ४.०० कि.मी. आहे सदर लांबीपैकी १.०० कि.मी. लांबीतील डांबरीनुतनीकरणाचे काम सन २०१४-१५ मध्ये करण्यात आले आहे. उर्वरीत रस्त्याचे डांबरीनुतनीकरणाचे काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत उपलब्ध निधी व निकषाच्या अधिन राहुन प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील**
**नांदुरा तालुक्यातील मौजे अलमपूर ते पातोंडा रस्त्याबाबत**

**(४३) १०७४९ (०८-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील नांदुरा तालुक्यातील मौजे अलमपूर ते पातोंडा रस्यामधील २ किमी लांबी रस्ता अत्यंत नादुरुस्त असून या रस्त्यावरुन सर्व सामान्य नागरीक, दुचाकी व चारचाकी वाहन धारकांना अवागमन करणे त्रासाचे झाले असल्याची बाब फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु. ३५ लक्ष निधीची आवश्यकता आहे ही बाब खरी आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) उपरोक्त रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांना वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन दिले आहे. जिल्हा परिषद बुलढाणाकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त नाही.

(४) नांदुरा तालुक्यातील मौजे अलमपूर ते पातोंडा हा रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार इतर जिल्हा मार्ग क्र. ४१ चा भाग रस्ता असुन त्याची लांबी ४.०० कि.मी. आहे. सदर रस्त्याच्या डांबरीनुतनीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त होणाऱ्या निधी व निकषाच्या अधिन राहुन प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) येथील मौजे देवधाबा ते भालेगांव**
**गावाजवळील रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(४४) १०७५० (१०-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) येथील मौजे देवधाबा ते मलकापूर रस्त्यावर मालेगांव गांवाजवळ कि.मी. ५ /८०० या भागात खोलगट भाग असल्यामुळे या रस्त्यावरुन सर्वसामान्य नागरिक, दुचाकी व चारचाकी वाहन धारकांना येण्या-जाण्यासाठी गैरसोईचे होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या खोलगट भागात लहान पुल बांधणे अत्यंत गरजेचे असून त्याचे बांधकाम करण्यासाठी रु.५० लक्ष निधीची आवश्यकता असून याबाबत स्थनिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, खामगांव यांना वेळोवेळी सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०६-२०१५) :** (१) प्रश्नांकित रस्त्याच्या खोलगट ठिकाणी पावसाळ्यात वाहनचालकांस वाहतूकीस गैरसोयीचे होते, हे खरे आहे,
(२) होय.
(३) सदर पुलाचे बांधकाम निधी व निकष प्राधान्याने हाती घेण्याचे नियोजन राहील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील रस्त्याच्या दुरूस्तीबाबत**

**(४५) १०७५१ (०९-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे राष्ट्रीय महामार्ग क्र.६ ते ए.पी.एम.सी. बेलाड पर्यंतचा रस्ता अत्यंत नादुरूस्त असून या रस्त्यावरून सर्वसामान्य नागरीक, दुचाकी व चारचाकी वाहनधारकांना अवागमन करणे त्रासाचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली असून या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी रू.३० लक्ष निधीची आवश्यकता आहे ही बाब खरी आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता दुरूस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांना वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन दिले आहे. जिल्हा परिषद बुलढाणाकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त नाही.
(४) मलकापूर तालुक्यातील रा.म.६ ते ए.पी.एम.सी. बेलाड पर्यंतचा रस्ता हा इतर जिल्हा मार्ग क्र. २४ रा.मा. ६ ते बेलाड, घिर्णी, दाताळा या रस्त्याचा भाग असुन या भाग रस्त्याची लांबी १.०० कि.मी. आहे. सदर रस्त्याच्या डांबरीनुतनीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध

योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजनआहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील**
**मौजे घिर्णी रस्ता अत्यंत नादुरूस्त असल्याबाबत**

**(४६) १०७५२ (०९-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे घिर्णी ते माकनेर रस्त्यातील ३ किमी लांबीचा रस्ता अत्यंत नादुरूस्त असून या रस्त्यावरून सर्वसामान्य नागरीक, दुचाकी व चारचाकी वाहनधारकांना अवागमन करणे त्रासाचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली असून या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी रू.६० लक्ष निधीची आवश्यकता आहे ही बाब खरी आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता दुरूस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगाव यांना वेळोवळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन दिले आहे. जिल्हा परिषद बुलढाणाकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त नाही.
(४) मलकापूर तालुकयातील मौजे घिर्णी ते माकनेर हा रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार इतर जिल्हा मार्ग क्र.३२ चा भाग रस्ता असून या भाग रस्त्याची लांबी ३.०० कि.मी. असून पृष्ठभाग खडीचा आहे. सदर रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त होणा-या निधी व निकषाच्या अधिन राहुन प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे भालेगाव ते निंबोळा रस्त्यातील १ किमी लांबीचा रस्ता अत्यंत नादुरूस्त झाल्याबाबत**

**(४७) १०७५३ (०९-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे भालेगाव ते निंबोळा रस्त्यातील १ किमी लांबीचा रस्ता अत्यंत नादुरूस्त असून या रस्त्यावरून सर्वसामान्य नागरीक, दुचाकी व चारचाकी वाहनधारकांना अवागमन करणे त्रासाचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली असून या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी रू.२० लक्ष निधीची आवश्यकता आहे ही बाब खरी आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता दुरूस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगाव यांना वेळोवळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-०७-२०१५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन दिले आहे. जिल्हा परिषद बुलडाणाकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त नाही.

(४) मलकापूर तालुक्यातील भालेगाव ते निंबोळा इतर जिल्हा मार्ग क्र. २४ चा भाग रस्ता असुन त्याची लांबी १.२०० कि.मी. आहे. सदर रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहुन प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे गौलखेड ते पोचमार्ग मलकापूर बोदवड मार्गास जोडणारा रस्ता अत्यंत नादुरूस्त असल्याबाबत**

**(४८) १०७५४ (०९-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे गौलखेड ते पोचमार्ग मलकापूर बोदवड मार्गास जोडणारा हा रस्ता ०.७५ किमी लांबीचा रस्ता अत्यंत नादुरूस्त असून या रस्त्यावरून सर्वसामान्य नागरीक, दुचाकी व चारचाकी वाहनधारकांना अवागमन करणे त्रासाचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली असून या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी रू.२० लक्ष निधीची आवश्यकता आहे ही बाब खरी आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता दुरूस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम विभाग, बुलढाणा यांना वेळोवळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१) ही बाब खरी नाही. सदर रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम मागील वर्षी सार्वजनिक बांधकाम विभागाने पूर्ण केले आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) जिल्हा परिषद बुलढाणाकडे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### रावेर (जि.जळगांव) येथून जाणा-या अंकलेश्वर - बऱ्हाणपूर राज्य महामार्ग ४ वरील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम निकृष्ट व अत्यंत संथगतीने होत असल्याबाबत

**(४९) १०८४५ (१०-०४-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावेर (जि.जळगांव) येथून जाणा-या अंकलेश्वर - बऱ्हाणपूर राज्य महामार्ग ४ वरील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम निकृष्ट व अत्यंत संथगतीने होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम निकृष्ट व अत्यंत संथ गतीने करणाऱ्या अधिकारी व ठेकेदारांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
अंकलेश्वर-ब-हाणपूर रस्ता कि.मी. ३३५/० ते ३७०/०० ही लांबी रावेर तालुक्यातून जाते. सदर लांबीत एकूण चार कामे सुरु आहेत. संकीर्ण कामे वगळता, सदर काम पूर्ण झाली असून सदर कामे सुस्थितीत आहेत.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रावेर मतदारसंघातील रस्त्यान्चे मजबुतीकरण, डांबरीकरण व पुलांची बांधकामे सुरु झालेले नसल्याबाबत**

**(५०) १०८४६ (०९-०४-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर मतदारसंघातील जिल्हा व इतर मार्ग आदिवासी ५०५४ ०४०२ या लेखा शिर्षअंतर्गत असलेले रस्ते मागील काही वर्षापासून मंजूर असूनही त्यांचे मजबुतीकरण, डांबरीकरण व पुलांची बांधकामे सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रलंबित कामे पूर्ण करण्यास शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२३-०६-२०१५) :** (१), (२) व (३)

रावेर, जि. जळगाव येथील रस्त्यांची ५२ कामे आदिवासी उपयोजनेतंर्गत मंजूर असून सद्यस्थितीत त्यापैकी ३३ कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरित कामांबाबत कार्यवाही सुरु आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.